## खापरखेडयात सजली काव्य मैफल



खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या १९ व्या वर्धापन दिनानिमित्त सद्भावना कामगार मनोरंजन केंद्र क्रमांक २ येथे आयोजित कवी संमेलनात प्रसिद्ध तथा स्थानिक कवींनी आपल्या दमदार रचना सादर करून उपस्थित रसिकांची मने जिंकली. दहशतवाद, देशातील भ्रष्टाचार, लैंगिक शोषण, राजकीय जुगलबंदी, शेतकरी आत्महत्या, वीज इत्यादी विषयांवर कवींनी आपल्या दमदार रचना सादर केल्या. संमेलनात श्री.भुपेश नेतनराव, अस्मिता बागडे, विलास ढवळे यांची 'तक्रार', हेमलता गर्गे यांची 'लोडशेडींग', नंदकुमार बाळापुरे यांचा वऱ्हाडी झटका 'कशी करशीन शामराव इजेची बचत' रसिकांची विशेष वाहवा मिळवून गेली. तर प्रा.सुनिल नाईकवाड यांनी 'भरकटलेली पिढी' विषयावर चिंतनात्मक कविता सादर करून उपस्थितांना विचार करायला भाग पाडले. 'ज्याच्या त्याच्या कानाले दिसते बापा मोबाईलचा वायर, तब्येतीकडे पायलं तर दिसते त्याचा घासलेला टायर' तर ''ए टी.व्ही. वालो, जरा होश मे तो आवो, घर-घरमे वासना की ज्वाला भडक रही है, लिखना मना नही है, बेनकाब करनेवालो, रहे याद कलम की शाई किसी नेक पर ना उडे'' या ओळींनी भारतीय संस्कृतीवर होणारे पाश्चिमात्त्य संस्कृतीचे आक्रमण विषद करित रसिकांना खिळवून ठेवले तर मातृभाषेवरील प्रेमातून कवी ओमप्रकाश ढोरे यांच्या 'आता मराठी अर्थ बघाया कोष लागतो, उरात इंग्रजी शब्द भरले आहे, घरात श्रद्धा अंध बनूनी वावरते, मठात मोठे गैर अजूनही घडते आहे' या ओळींना रसिकांनी भरभरून दाद दिली. सारिकाताई कुर्वे यांनी मुंबई हल्ल्यातील शहिदांच्या मनातील 'जखमा उरात माझ्या देऊन चाललो मी, हे राष्ट्र देवता रे तुज आखरी सलामी' या ओळीने देशप्रेमाची भावना जागृत केली. कवी प्रा.कृष्णा कुंभारे यांची सावलीची पाने, तर कवी राम भोंडे, कलाम अहमद खान, जमिल अहमद अन्सारी इत्यादी कवींच्या रचनांना रसिकांची प्रचंड दाद मिळाली.

वर्धापन दिनाच्या निमित्ताने श्री.शशिकांत डोंगरे, मुख्य महाव्यवस्थापक यांच्या मार्गदर्शनाखाली तथा वर्धापन दिन आयोजन समितीच्या नेतृत्वाखाली घेतलेल्या या कार्यक्रमाचे उपस्थित श्रोत्यांनी तोंडभरून कौतुक केले. शंकर घोरसे यांचे काव्यमय संचलन रसिकांना फार भावले. त्यांच्या 'बरं झालं ज्योतिबा तुम्ही सती प्रथा बंद केली, आज हुंडयाचे द्वंद घरोघरी छळत आहे, तेव्हा चितेवर जळत होती, आता घरी 'ती' रॉकेल घेऊन जळत आहे' 'बरं झालं सावित्री तु लेखणी पाटी दाखवली, तुझ्या लेखणीमुळेच आम्ही सदा अग्रेसर ठरत आहोत, गर्भलिंग निदान करून जन्मापूर्वीच मरत आहोत' तसेच मंदी, सत्कार आदी कविता उल्लेखनीय होत्या. यांनतर बारापात्रे, पूजा बंग, जगदीशचंद्र बेलसरे, येरणे, डी.पी. भोयर, डी.सी. ताकसांडे यांनीही आपल्या काव्यरचना सादर केल्या.

अधीक्षक अभियंता श्री.एम.एन.कुंडलवार हे कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते. श्री.आनंद कोंत, आस्थापना अधिकारी (कोराडी वीज केंद्र), वऱ्हाडी मायबोली फेम श्री.यशवंत मोहिते, जनसंपर्क सहाय्यक (विदर्भ) यांची विशेष उपस्थिती होती. प्रारंभी प्रास्ताविक व आभारप्रदर्शन कल्याण अधिकारी श्री.बाळासाहेब पाटील यांनी केले. संमेलनाच्या आयोजनाकरिता खापरखेडा वीज केंद्राचे वरिष्ठ अधिकारी, अभियंता, तंत्रज्ञ तथा कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले तर स्पर्धा यशस्वीतेसाठी उमेश चरपे, राजेश कमाले, व्ही.आर. तरासे, सद्भावना कामगार मनोरंजन केंद्र सचिव, दुर्गेश चरपे, नेहा बोंदरे व सलोनी मोहने आदींनी परिश्रम घेतले.

## श्री.रवि देशपांडे उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायमूर्ती



विदर्भातील प्रथितयश वकील श्री.रवि देशपांडे यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी नियुक्ति केली असून नुकतीच मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री.स्वतंत्र कुमार यांनी श्री.रवि देशपांडे यांना शपथ दिली.

श्री.रवि देशपांडे यांनी मागील अनेक वर्षापासून म.रा. विद्युत मंडळ तसेच महानिर्मिती कंपनीची न्यायप्रविष्ट प्रकरणे हाताळली आहेत. त्यात प्रामुख्याने वीज कर्मचाऱ्यांची प्रकरणे, वीज संघटनांची प्रकरणे, तांत्रिक प्रकरणे, भारनियमन विषयक प्रकरणे, जनहित याचिका तसेच वीजनिर्मिती कंपनीला वेळोवेळी कायदेशीर सल्ला देऊन त्यांनी योग्य दिशा दाखविली आहे. महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री.अरविंद चौधरी यांनी श्री.रवि देशपांडे यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी श्री.आनंद कोंत, आस्थापना अधिकारी (कोराडी) व श्री.यशवंत मोहिते, जनसंपर्क सहाय्यक (विदर्भ) प्रामुख्याने उपस्थित होते.

विधी क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, चतुरस्त्र बुद्धीमत्ता आणि कायद्याचा गाढा अभ्यास या त्रिसूत्रीच्या आधारे श्री.रवि देशपांडे यांचे हातून निरंतन उत्तमोत्तम कार्य घडेल हीच महानिर्मितीकडून शुभेच्छा.

## ऊर्जानगर येथे दुसऱ्या टप्प्यातील पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फुर्त प्रतिसाद



श्री.हरिदास चौधरी पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ करताना.

भारत सरकारच्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या निर्मुलनाचा एक भाग म्हणून दिनांक १ फेब्रुवारी २००९ पोलिओ रविवारला चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्र वसाहत ऊर्जानगर या ठिकाणी तीन मुख्य केंद्रावर पल्स पोलिओ लसिकरण मोहिमेत ५ वर्षे वयोगटातील बालकांना पल्स पोलिओ डोज पाजण्यात आला. या पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

या मोहिमेचा शुभारंभ चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्र येथील दवाखान्यात मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.चौधरी यांचे हस्ते तर महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्र या ठिकाणी ग्राम पंचायत सदस्य अविनाश राखुंडे यांचे उपस्थितीत करण्यात आला.

या कार्यक्रमात वसाहतीत योग्य रीतीने राबविण्यासाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ.किशोर राऊत, डॉ.अशोक आसटवार, डॉ.अमित ग्वालवंशी, यांच्या मार्गदर्शनाखाली येथिल दवाखान्यातील कर्मचारी शेखर गाडगे, येशूदास मेश्राम, महेंद्र जुनघरे, नरेंद्र हक्के, सौ.सुशिला पाटील, सौ.शिला समद्दार, सौ.अरूणा जुनघरे, सौ.अनित बोकाडे, सौ.कविता मसराम, कु.शिवनी दास, सौ.मंदा बोकाडे, सौ.विद्या दळवी, सौ.चंद्रकला डांगे, श्रीमती दोरसटवार, दिनेश रेवतकर, पुंडलिक ताकसांडे, श्रीकांत चिमलवार, एस.आर. पठाण यांनी विशेष सहकार्य केले.